# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
# दिनांक ०१.०३.२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता
# आयोजित केलेल्या २५३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची २५३ वी बैठक शनिवार, दिनांक ०१.०३.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई : ४०० ०२१ येथे आयोजित करण्यात आली.

**सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :**

| | | | |
|---|---|---|---|
| **१.** | **श्री. सतीश म. गवई**<br>**उपाध्यक्ष/ प्राधिकरण** | **:** | **पदसिध्द अध्यक्ष/प्राधिकरण** |
| **२.** | **श्री. देबाशिष चक्रवर्ती**<br>**प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग** | **:** | **सदस्य/ प्राधिकरण** |
| **३.** | **श्री. मनुकुमार श्रीवास्तव,**<br>**प्रधान सचिव, नगरविकास विभाग** | **:** | **सदस्य/प्राधिकरण** |

बैठकीच्या सुरवातीस सचिव / प्राधिकरण यांनी सन्माननीय सदस्य आणि उपस्थितांचे स्वागत केले व मा. उपाध्यक्ष तथा पदसिध्द अध्यक्ष/ प्रा. यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्यात आले.

**बाब क्रमांक २५३/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १९.१२.२०१३ रोजी झालेल्या २५२ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

**-------------------**

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

चर्चेदरम्यान मुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले कीं, बैठक क्र.२५२ च्या कार्यवृत्तांतातील पृष्ठ क्र.८ वरील बाब क्रमांक २५२/४ " मौजे कोलेकल्याण नभूक्र ५६११ पै असलेल्या मे.जय भगवती डेव्हलपर्स अन्ड बिल्डर्स यांना वितरित झालेल्या सुमारे ३२९.७५ चौ.मी. क्षेत्रफळाचे तसेच सदर भूखंडापैकी श्री.इम्रान शेख यांना भाडेतत्वावर सुमारे १५०.०० चौ.फुट क्षेत्राचे वितरण रद्द करण्याबाबत " या बाब टिपणीवर चर्चेअंती निर्णय होऊन मंजूरी देण्यात आली होती, परन्तु ठराव बनविण्याचे राहून गेले. यावर चर्चा होऊन सांताक्रुझ - न.भू.क्र. ५६११ कोलेकल्याण येथील मुंबई मंडळाच्या मालकीच्या ३२९.७५ चौ.मी. भूखंडाचे मे. जय भगवती डेव्हलपर्स ॲण्ड बिल्डर्स यांना केलेले वितरणाबाबत व न.भू.क्र. ५६११ चा ३२९.७५ चौ.मी. भूखंड व सदर भूखंडाशेजारील मे. जय भगवती डेव्हलपर्स यांच्या मालकीचा न.भू.क्र. ५६१२ चा १७६.२३ चौ.मी. भूखंडावरील संयुक्तिक गृहनिर्माण योजनेबाबत.

प्राधिकरणाच्या दि.१९.१२.२०१३ बाब क्र.२५२/४ मध्ये झालेली चर्चा अर्जदारास अवगत केलेले आहे. त्यानुसार म्हाडाच्या दि.१४.११.२०१३ रोजीच्या नवीन धोरणानुसार (Joint Venture) ३.० च.क्षे.नि. उपलब्ध होत आहे.

म्हाडाच्या मालकीच्या भूखंड क्र.५६११(भाग) क्षेत्रफळ ३२९.७५ चौ.मी. अंतर्गत चटईक्षेत्र निर्देशांक ३.० नुसार उपलब्ध होणारे बांधकाम **(full potential)** ३२९.७५ चौ.मी.X ३.० = ९८९.७५ चौ.मी.क्षेत्रफळ म्हाडास बांधून उपलब्ध करून देण्याबाबत सहमती दर्शविलेली आहे. त्यास अनुसरुन चर्चेअंती सन्माननीय सदस्यांनी पुढीलप्रमाणे ठराव करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार चर्चा होऊन

**ठराव क्रमांक : ६६४७** **दिनांक : ०१/०३/२०१४**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

१) मौजे कालेकल्याण नभूक्र ५६११ पै असलेल्या मे.जय भगवती डेव्हलपर्स अन्ड बिल्डर्स यांना वितरित झालेल्या सुमारे ३२९.७५ चौ.मी. क्षेत्रफळाचे तसेच सदर भूखंडापैकी श्री.इम्रान शेख यांना भाडेतत्वावर सुमारे १५०.०० चौ.फुट क्षेत्राचे वितरण रद्द करण्याबाबत म्हाडाच्या मालकीच्या भूखंड क्र.५६११ (भाग) क्षेत्रफळ ३२९.७५ चौ.मी. अंतर्गत चटईक्षेत्र निर्देशांक ३.० नुसार उपलब्ध होणारे बांधकाम **(full potential)** ३२९.७५ चौ.मी.X ३.० = ९८९.७५ चौ.मी.क्षेत्रफळ म्हाडास अर्जदाराने बांधून उपलब्ध करून देणे.

२) त्यापैकी ३३१.०० चौ.मी. बांधकामापोटी येणारा खर्च (रु. ५८,१६,८००) अर्जदारास रेडीरेकनर दर २०१३ नुसार प्रती चौ.मी.साठी बांधकाम खर्च अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३) अर्जदारास वितरीत केलेल्या भूखंड ५६११ (भाग) च्या वितरणापोटी म्हाडाने अर्जदाराकडून वसूल केलेले रक्कम रू.८३,४५,१७३/- परत करावयाची आहे, त्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे उपरोक्त बाबींकरिता खालील अटी शर्तींवर अर्जदारांवर बंधनकारक राहतील.

**अ)** संस्थेने वि.नि.नि.३३(५) अंतर्गत मुंबई म.न.पा. च्या इमारत प्रस्ताव विभागातर्पे आवश्यक त्या सर्व मंजू-या प्राप्त करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

**ब)** अर्जदाराने वि.नि.नि.३३(५) मधील नियम (५ ) अन्वये मुंबई पालिकेच्या संबंधीत इमारत प्रस्ताव विभागाकडे अतिरिक्त चटईक्षेत्रफळाच्या अधिमुल्याच्या १२.५% एवढी रक्कम ऑफसाईट इन्फ्रास्टक्चर फी मुंबई मंडळाच्या नाहरकत प्रमाणपत्रापूर्वी परस्पर भरणा करणे आवश्यक राहील.

वरील ठरावास प्राधिकरण एकमताने मंजूरी देत आहे.

सन्माननीय सदस्यानी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतात सुचविलेल्या दुरुस्तीसह आणि दिलेल्या सुचनांसह सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक २५३/३**

**विषय :- स.क्र.३०९ (पैकी) मौजे पिंपरी वाघिरे, जि.पुणे येथील म्हाड अधिनियम कलम ४१ अंतर्गत निर्देशित केलेले एकूण क्षेत्र सुमारे ७.२५ हेक्टर पैकी सुमारे ४.१२ हेक्टर क्षेत्राचे दिनांक २७/०५/२०१३ रोजी झालेले भूसंपादन.**

--------------------

**ठराव क्रमांक : ६६४८ दिनांक ०१/०३/२०१४**

पिंपरी वाघिरे स.नं.३०९, येथील भु संपादन झालेल्या क्षेत्राकरीता जमिन मालकांना द्यावयाचा, जिल्हाधिकारी, पुणे यांनी जमिन दर वाटाघाटीच्या वेळी अंतिमत: प्रस्तावित केलेला जमीन मोबदल्याचा नक्त रू.१४०००/- प्रति चौ.मी. मंजूर करणे व त्यानुसार उप जिल्हाधिकारी भु संपादन क्र.३, पुणे या कार्यालयाने, **भूसंपादीत केलेल्या एकूण ४१२४३.१७ चौ.मी. या क्षेत्राकरीता जमीनीची किंमत रू.५७,७४,०४,३८०/- + १० टक्के नजराना रक्कम रू.५,७७,४०,४३८/- तसेच आस्थापना खर्च रू.२,९०,५४,३४५/- अशी एकूण ६५,४१,९९,१६३/- ही निवाडयाची अंदाजित रक्कम तसेच कार्यालयीन खर्चाकरीता मागणी केलेली रक्कम रु.५,००,०००/- अशी एकूण रक्कम रू.६५,४६,९९,१६३/- उप जिल्हाधिकारी भु संपादन क्र.३, पुणे या कार्यालयाकडे वर्ग करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.**

स्थायीकरणाची वाट न पहाता सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**बाब क्रमांक २५३/४**

**विषय :-महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाच्या अखत्यारितील यशवंत सहकारी साखर कारखाना, थेऊर, जिल्हा पुणे यांचे मालकीची चिंतामणी नगर, थेऊन, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील गट क्र.१, २(पै), ३४, ३६, ३७, ४१/१ ही सुमारे ११७ एकर जमिन म्हाड कायदा १९७६ वे कलम ४१ अन्वये खरेदी करण्याबाबत.**

---------------------------------------

**ठराव क्र.६६४९** **दिनांक - ०१/०३/२०१४**

थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याची प्रस्तावित करण्यात आलेल्या एकूण सुमारे ११७ एकर जमिनीपैकी उत्तरेकडील प्रत्यक्ष कारखान्यालगत असलेली व नीलरेषेत येणारी जमिन वगळून उर्वरित जमिन म्हाडामार्फत खालील अटी व शर्तींवर **जमिन संपादन** करण्यास तात्विक मान्यता देण्यात येत आहे :-

१. सदर जमिनीचे कारखान्यामार्फत भूसंपादन शासनामार्फत होवून त्याचा मोबदला शासनाकडून दिला नसल्याची खात्री करणे.
२. सदर जमिनीच्या विक्रीस शासनाच्या संबधित विभागाची मान्यता असल्याची खात्री करणे.
३. सदर खरेदी करण्यात येणा-या जमिनीच्या निवासी विभागात रूपांतरीत करण्यास कारखान्याने शासनाची मान्यता घेणे.
४. भविष्यात कारखान्यामुळे होणारे प्रदुषण व ते टाळण्याकरीता अथवा आटोक्यात राहण्याकरीता संबंधीत विभागाकडून / कारखान्याकडून अवलंबिण्यात येणारी नवीन तंत्रज्ञान / उत्पादन पध्दतीची माहिती घेणे.
५. सदर जमिनीवर अस्तिवात असलेल्या उच्च / मध्यम /कमी दाब विद्युत वाहिन्या कारखान्यामार्फत व त्यांचे खर्चाने स्थलांतरीत करण्यात येतील.
६. सदर जमिनीवरील सर्व प्रकारचे दायित्वे / बोजे जमिन प्रत्यक्ष खरेदी करण्यापुर्वी कारखान्यामार्फत संपूष्टात आणणे.
७. **अटी व शर्तींबाबत कारखान्याकडून क्षतीपूर्तीबंधपत्र (Indemnity Bond) घेण्यात यावे.**

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक २५३/७**

**विषय :-** **मुंबई वगळता प्रादेशिक मंडळा अंतर्गत असलेल्या महानगरपालिका हद्दीतील म्हाडा वसाहतीमधील इमारतीच्या पुनर्विकासाबाबत. शासनाकडे सादर करण्यात आलेल्या सुधारीत धोरणाबाबतची माहिती प्राधिकरणास सादर करणेबाबत.**

---------------------------------

**ठराव क्रमांक : ६६५०** **दिनांक : ०१/०३/२०१४**

सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की, मुंबईपेक्षा ३३ [५] अंतर्गत जास्त फरक ठेवू नये. सदरचा प्रस्ताव मुख्य अधिकारी,मुंबई मंडळ व मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी चर्चा करन प्रधान सचिव,नगर विकास-१ यांचे कडे पाठवावा.

# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
# दिनांक : ०१.०३.२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता
# आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची अर्थसंकल्पीय विशेष बैठक शनिवार, दिनांक ०१.०३.२०१४ रोजी दुपारी २.०० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई : ४०० ०२१ येथे आयोजित करण्यात आली.

सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :

**१. श्री. सतीश म. गवई, : पदसिध्द अध्यक्ष/प्राधिकरण**
**उपाध्यक्ष / प्राधिकरण**

**२. श्री.देबाशिष चक्रवर्ती : सदस्य/प्राधिकरण**
**प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग**

**३. श्री. मनुकुमार श्रीवास्तव, : सदस्य/प्राधिकरण**
**प्रधान सचिव, नगरविकास विभाग**

सचिव/प्राधिकरण यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.उपाध्यक्ष तथा पदसिध्द अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्या पूर्वी मा.उपाध्यक्ष तथा पदसिध्द अध्यक्ष / प्राधिकरण यांनी सभागृहापुढे म्हाडाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर केले..

**बाब क्रमांक : १**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे**
**सन् २०१३-२०१४ चे सुधारित अंदाजपत्रक व**
**सन् २०१४-२०१५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

--------------------

**ठराव क्रमांक : ६६५१** **दिनांक : ०१/०३/२०१४**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०१३-२०१४ च्या सुधारित अंदाजपत्रक रु. **३०५.८५** कोटी रक्कमेच्या तूटीच्या अंदाजपत्रकास व सन २०१४-२०१५ च्या रु. **१२३४.६१** कोटी रक्कमेच्या तुटीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच बांधकाम कार्यक्रमास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

**बाब क्रमांक : ३**

**विषय :- महाराष्ट्र निवारा निधीचे सन २०१३-२०१४ सुधारित अंदाज व सन २०१४-१५ वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.**

------------------------

**ठराव क्रमांक :६६५२ दिनांक : ०१/०३/२०१४**

एकमताने निर्णय घेतला की, शासन निर्णय क्र.नानिफं २००८/प्र.क्र.२१३/गृनिधो-२, दिनांक ३१/०५/२०१० नुसार महाराष्ट्र निवारा निधीचे लेखे स्वतंत्र प्रत्येक वर्षी विधान मंडळास सादर करावयाचे असल्याने महाराष्ट्र निवारा निधीचा अर्थसंकल्प म्हाडा अर्थसंकल्पात अंतर्भूत न करता, महाराष्ट्र निवारा निधीचे सन २०१३-२०१४ सुधारित व सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.